# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांना कळविण्यास आनंद होतो की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७५ वा वर्धापनदिन १० फेब्रुवारी, २०२४ रोजी संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांसाठी **दि. ०६ ते ०९ फेब्रुवारी, २०२४** दरम्यान क्रिकेट, डॉजबॉल व फनी गेम्स स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी सर्व विभागांच्या संघानी आपल्या संघाच्या प्रवेशिका **दि. ०५ फेब्रुवारी, २०२४ दुपारी ०३.०० पर्यंत** क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ कार्यालयामध्ये जमा करून सहकार्य करावे. उशीरा येणाऱ्या संघाच्या प्रवेशिकांचा विचार करण्यात येणार नाही.

| क्र. | स्पर्धेचा प्रकार | नियम व अटी (स्पर्धेचे स्थळ :– गेस्टहाऊस मागील मुख्य मैदान) |
|---|---|---|
| १ | क्रिकेट (मिश्र) | १. प्रत्येक विभागाच्या फक्त एकाच संघास प्रवेश देण्यात येईल.<br>२. प्रत्येक विभागाच्या संघाची प्रवेशिका विभागप्रमुख यांच्यामार्फत सादर करणे आवश्यक आहे.<br>३. संघामध्ये ११ खेळाडूंपैकी ८ पुरूष व ३ महिला खेळाडूंचा समावेश असेल.<br>४. सामने ६ षटकांचे राहतील.<br>५. प्रत्येक गोलंदाजास कमाल ०२ षटके मर्यादा असेल.<br>६. संघाने सामन्यापूर्वी १५ मिनिट अगोदर मैदानावर उपस्थित रहावे.<br>७. सामने सकाळी ९ ते ६ यावेळेत होतील.<br>८. पंचांचे निर्णय अंतिम राहतील. |
| २ | फनी गेम्स | डॉजबॉल फक्त (महिलांकरीता), संगीत खुर्ची, तीन पायाची शर्यत, सॅक रेस व Sweet Eating स्पर्धा आयोजित करण्यात येतील. त्यामध्ये प्रथम पुरूष गटाच्या स्पर्धा होतील व त्यानंतर महिला गटाच्या स्पर्धा होतील. |

टिप :– **१) क्रिकेट स्पर्धाचे भाग्यचक्र दि. ०५ फेब्रुवारी, २०२४ रोजी दु. ०४. ०० वा. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ कार्यालयामध्ये संघनायकांसमोर टाकण्यात येईल. २) स्पर्धा उद्घाटन कार्यक्रम समारंभ मंगळवार, दि. ०६ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे. ३) सदरची स्पर्धा ही सध्या विद्यापीठात कार्यरत असलेल्या सर्व समावेशक सेवकांसाठीच असेल. ४) ज्या विभांगाची सेवक संख्या ही १० पेक्षा कमी असेल, अशा विभागांच्या सेवकास सांघिक खेळाकरीता एकत्रित संघ करण्याची मुभा असेल, ही मुभा १० पेक्षा जास्त सेवक कार्यरत असलेल्या विभागास लागू असणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

प्रा. (डॉ.) विजय खरे
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड
जावक क्र. आर./२/८३
दिनांक : ०२/०२/२०२४

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी

१. सर्व संबंधित शैक्षणिक विभागप्रमुख }- सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व सेवकांच्या
२. सर्व संबंधित प्रशासकिय शाखाप्रमुख }- निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.